HSBC

# फॉर्म 15G आणि 15H

मुदतठेवीवर दिलेले/ खात्यावर जमा केलेले व्याज आयकर कायदा, 1961 अन्वये टीडीएस (कर उद्गम कपातीस) बांधील असते.

मात्र, असा टीडीएस खालील प्रकरणी लागू होत नाही:

1. ज्यावेळी विशिष्ट व्यक्तीला, एका बँकशाखेद्वारे (वरिष्ठ नागरिकांव्यतिरिक्त), जो भारतीय **नागरिक** असेल, त्याला एका वित्तीय वर्षात (1 एप्रिल ते 31 मार्च) एकूण दिले जाणारे/खात्यात जमा होणारे व्याज रू. 40,000 (1 एप्रिल 2019 पूर्वी रू. 10,000) पेक्षा जास्त नसेल. वरिष्ठ नागरिकांच्या बाबतीत ही मर्यादा एका वित्तीय वर्षासाठी रू. 50,000 इतकी आहे.
2. **कोणत्याही व्यक्तीच्या** बाबतीत **(कंपनी किंवा फर्मसोडून)** [नियम 29सी सोबत वाचला असता, कलम 197ए(1ए)]:
   - अ. जो भारतीय **नागरिक** आहे; आणि
   - ब. ज्याचा **संबंधित वित्तीय वर्षासाठी** (1 एप्रिल ते 31 मार्च), एकूण अनुमानित उत्पन्नासाठी वार्षिक एकूण आयकर दायित्व **शून्य** असेल. (कृपया लक्षात घ्या की, एकूण कर गणना टीडीएस वगळून करावयची आहे); आणि
   - क. अशा व्यक्तीच्या बाबतीत, ज्यांच्या मुदत ठेवी (ठेवींवरील) देय/अनुदेय एकूण व्याज, संबंधित वित्तीय वर्षात करपात्र नसणाऱ्या अधिकतम रकमेपेक्षा जास्त नसेल; आणि
   - ड. जी व्यक्ती प्रत्येक वित्तीय वर्षात, विहित नमुन्यातील पूर्ण भरलेला **15G (दोन प्रतींमध्ये)** फॉर्म शाखेमध्ये मुदतीआधी जमा करेल.

कृपया लक्षात घ्या की, फॉर्म 15G प्रत्येक वित्तीय वर्षासाठी जमा करायचा असतो आणि सदर लागू टीडीएससाठी दिलेल्या दिनांकापूर्वी किंवा त्या दिनांकाला (शाखेकडे) 15G फॉर्म जमा करण्यास विलंब/चूक झाल्यास बँक दिलेल्या/खात्यावर जमा केलेल्या व्याजावर टीडीएस कापेल. अशा प्रकारे कापल्या गेलेल्या टीडीएससाठी परताव्याचा दावा थेट आयकर विभागाकडे करावा लागेल, बँक त्यासाठी जबाबदार असणार नाही.

3. अशा व्यक्तींच्या बाबतीत [नियम 29सी सोबत वाचला असता, 197ए (1सी)]:
   - अ. जो भारतीय **नागरिक** आहे; आणि
   - ब. संबंधित वित्तीय वर्षात (1 एप्रिल ते 31 मार्च) ज्याचे **वय 60 वर्षे किंवा त्याहून जास्त आहे;** आणि
   - क. ज्याची **संबंधित वित्तीय वर्षात एकूण उत्पन्नावरील देय कर रक्कम शून्य** आहे. (कृपया ध्यानात घ्या की, एकूण करपात्र रक्कमेची गणना टीडीएस वगळून करावयाची असते.)
   - ड. अशा व्यक्तीच्या बाबतीत ज्यांच्या मुदत ठेवी (ठेवींवरील) देय/अनुदेय एकूण व्याज, संबंधित वित्तीय वर्षात करपात्र नसणाऱ्या अधिकतम रकमेपेक्षा जास्त नसेल; आणि
   - इ. जी व्यक्ती प्रत्येक वित्तीय वर्षात, विहित नमुन्यातील पूर्ण भरलेला **15H (दोन प्रतींमध्ये) फॉर्म** शाखेमध्ये मुदतीआधी जमा करेल.

कृपया लक्षात घ्या की, फॉर्म 15H प्रत्येक वित्तीय वर्षासाठी जमा करायचा असतो आणि सदर लागू टीडीएससाठी दिलेल्या दिनांकापूर्वी किंवा त्या दिनांकाला (शाखेकडे) 15H फॉर्म जमा करण्यास विलंब/चूक झाल्यास बँक दिलेल्या/खात्यावर जमा केलेल्या व्याजावर टीडीएस कापेल. अशा प्रकारे कापल्या गेलेल्या टीडीएससाठी परताव्याचा दावा थेट आयकर विभागाकडे करावा लागेल, बँक त्यासाठी जबाबदार असणार नाही.

INTERNAL

Issued by The Hongkong and Shanghai Banking Corporation Limited, India. Incorporated in Hong Kong SAR with limited liability.